सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०८/०८/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०५२४ / प्र.क्र.८८/ विशा-३(अ), दिनांक ०६ ऑगस्ट, २०२४.

**विषय** :- अंमली पदार्थ नियंत्रणासाठी राज्यस्तरीय व घटक स्तरावरील नोडल अधिकारी यांची नमणूक करण्याबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- ०५२४/ प्र. क्र.८८/ विशा-३ (अ), दिनांक ०६ ऑगस्ट, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०८०६१६४७०९१५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
सहायक पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र. २६-ब,

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**अंमली पदार्थ नियंत्रणासाठी राज्यस्तरीय व घटक स्तरावरील नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०५२४/प्र.क्र.८८/विशा-३(अ)**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२४

**संदर्भ:-**

१. भारत सरकार गृह विभाग, नवी दिल्ली यांचे आदेश क्रमांक १-१२०२३/०२/२०१७ / NCB II दि. २९.०७.२०१९ व आदेश क्रमांक १-१२०२३/०२/२०१७ / NCB II (Vol-I), दि. २५.०३.२०२२ व २३.०९.२०२२
२. महानिदेशक, स्वापक नियंत्रण ब्युरो, नवी दिल्ली यांचे अ.शा. पत्र क्र.III/४/एन्कोर्ड-५वीं एपेक्स/समन्वय/ २०२२/१०७, दि.१९/०१/२०२३
३. महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे आदेश क्र. NDP ०४०४ / २३५/CR-९/SPL-३(A), दि.०५.०८.२००६
४. महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे आदेश क्र. NDP १००० / २३५ /CR-१०/SPL-३(A), दि.०६.०१.२००७
५. सम क्रमांकाचे शासन निर्णय दि.३१.०८.२०२३
६. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.),महाराष्ट्र राज्य,मुबंई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/Narcotics(ANTF)/109/2022, दि.३०.०५.२०२३

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ आदेशान्वये अंमली पदार्थाचे व्यापार व तस्करी विरूध्द प्रभावी कार्य करण्यासाठी प्रत्येक राज्यामध्ये टास्क फोर्स स्थापन करण्याबाबत निर्देश दिले आहेत. याअनुषंगाने महाराष्ट्र राज्यात पोलीस महासंचालक यांच्या मार्गदर्शन व अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नियंत्रण आणि देखरेखीखाली विशेष पोलीस महानिरीक्षक,पुणे यांच्या अधिपत्याखाली अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यास तत्वत: उपरोक्त संदर्भ क्र.५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

दि.०५.०८.२००६ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या State Level Anti Narcotics Apex Co-ordination Committee व Anti Narcotics Task Force समित्याच्या सदस्यांचा समावेश दि. २५.०३.२०२२ रोजीच्या आदेशान्वये स्थापन करण्यात आलेल्या State Level NCORD Committee मध्ये करण्यात आला आहे. तसेच, उपरोक्त संदर्भ क्र.५ मधील शासन निर्णयान्वये नमूद करण्यात आलेल्या अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या स्थापनेचा उद्देश मधील मुद्दा क्र.५ अन्वये केंद्रिय यंत्रणा व राज्यस्तरीय यंत्रणामध्ये समन्वये ठेवतील असे नमूद करण्यात

आलेले आहे.त्यासअनुसरून संदर्भ क्र.३ व ४ मधील शासन निर्णय अधिक्रिमत करून राज्यस्तरीय व घटक स्तरीय नोडल अधिकारीच्या रचनेमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१. केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या उपरोक्त संदर्भ क्र.१च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन सेंटर (NCORD) यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली आहे.त्यासअनुसरून उपरोक्त संदर्भ क्र.५ अन्वये महाराष्ट्र राज्यात अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यात आला आहे.सबब, राज्यातील अंमली पदार्थाच्या नियंत्रणाच्या कामकाजामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी उपरोक्त संदर्भ क्र.३ व ४ मधील अनुक्रमे दि.०५.०८.२००६ व ०६.०१.२००७ रोजीचे शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

२. महाराष्ट्र राज्यात अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यास उपरोक्त संदर्भ क्र.५ रोजीच्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता देण्यात आली असल्यामुळे अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स,महाराष्ट्र राज्य,पुणे हे राज्यासाठी NCORD (Narco Coordination Centre)सचिवालय म्हणूनही काम करेल आणि NCORD च्या विविध स्तरावर घेतलेल्या निर्णयांच्या पूर्ततेच्या पुढील कार्यवाहीवर लक्ष ठेवतील.

३. राज्यातील नोडल अधिकारी म्हणून विशेष पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,पुणे हे राहतील व इतर पोलीस घटकामध्ये समन्वय ठेवतील.

४. राज्यातील पोलीस घटक स्तरावर नोडल अधिकारी व त्यांची कर्तव्ये खालील प्रमाणे राहील.

| Name of the Unit | Nodal Officer |
|---|---|
| Mumbai Commissionerate | Deputy Commissioner of Police, Anti narcotics Cell (ANC) |
| All Other Commissionerate | Addl. Commissioner of Police (Crime)/DCP (Crime) |
| All Districts including Railways | Police Inspector, Local crime Branch. |

**कर्तव्ये:-**

अ) पोलीस घटक स्तरावर घटक प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रात अंमली पदार्थ विरोधी कायद्याची अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

आ) अंमली पदार्थ विरोधी कायद्याच्या अंमलबजावणीशी संबंधित माहिती संकलीत करणे आणि राज्यस्तरीय अंमली पदार्थ विरोधी नोडल अधिकाऱ्याकडे नियमित अहवाल पाठविणे.

इ) इतर सर्व अंमलबजावणी संस्थाशी समन्वये साधणे.

५. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०८०६१६४७०९१५२९ असा आहे.. शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAHUL VIJAY KULKARNI

Digitally signed by RAHUL VIJAY KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=019d1a40755cacf50cb371c432c67afaec7da5aad928d966ad4270c6a4f1ac39, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=31493D4A6291F531ED8FD00972CCBFA0376623C7F6C38C3B848BFBE06685A219, cn=RAHUL VIJAY KULKARNI
Date: 2024.08.06 17:02:58 +05'30'

(राहुल कुलकर्णी)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
२. मा .उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मुख्य सचिव यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (गृह), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव (विशेष), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. पोलीस महासंचालक,दहशतवाद विरोधी पथक,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
८. अपर पोलीस महासंचालक (नि.व स.) महाराष्ट्र राज्य,मुंबई.
९. अपर पोलीस महावंचालक,गुन्हे अन्वेषण विभाग,महाराष्ट्र राज्य,पुणे.
१०. निवड नस्ती /विशा-३अ